९.०० 
२८-१२-२०२२

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २८/१२/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार गोवर साथरोगावर विविध उपाय योजना केल्या आहेत. त्या अंतर्गत दिनांक १५ ते २५ डिसेंबर २०२२ तसेच दिनांक १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत दोन टप्प्यामध्ये उल्हासनगर शहरात विशेष गोवर रूबेला लसीकरण सत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये पहिल्या टप्पयामध्ये प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत मायकिंगद्वारे प्रचार करण्यात आला. कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी जसे अंगणवाडी केंद्र, शाळेत, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व खाजगी रूग्णालय येथे बॅनर व पोस्टर मार्फत जनजागृती करण्यात आली तसेच घरोघरी आशा मार्फत पॅम्पलेट्स वाटप करण्यात आले. पहिल्या टप्पयामध्ये झालेल्या सर्व्हेक्षण व लसीकरणाचा अहवाल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | दिनांक | घरांची संख्या | संशयित रूग्ण | पाठविण्यात आलेले नमुने | गोवर निदान झालेले रूग्ण | विटामिन ए दिलेले लाभार्थी | आयोजित सत्राची संख्या | अतिरिक्त लसीकरण झालेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७/१२/२०२२ | ४४८५ | ९१ | ८६ | ५ | १७९६ | ७७ | ५१८६ |

तसेच वेळोवेळी प्राप्त होणा-या शासकीय मार्गदर्शक सुचनेनुसार जनजागृती व विशेष लसीकरण सत्र करण्यात येईल.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका